| MHSO200004492013 | **नियमित दिवाणी दावा क्र. १३०/२०१३** |
|---|---|

## निशाण क्र. ९२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादीचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले हया दि. २८/११/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. सदर प्रतिवादी क्र. ५ यांच्या मयताचा दाखला व त्यानंतर मयताचे वारसांची माहिती वेळेत मिळालेली नसल्यामूळे त्यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत. सबब, सदर विलंब माफ करण्यात यावा अशी वादीने विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादींतर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जातील विलंबाचे संयुक्तीक नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रतिवादींविरुध्द सदरचा दावा जाहीरीकरणासाठी, वाटपासाठी व पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जात वादीने मयत प्रतिवादी क्र. ५ यांचा मृत्यू दाखला व त्यानंतर मयताचे वारसांची माहिती वेळेत मिळालेली नसल्यामूळे त्यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत असे कारण नमूद केले आहे. सदर कथनाच्या पृष्टयार्थ नि.क्र. ९३ वर वादीने शपथपत्र दाखल केलेले आहे. अभिलेखावर दाखल नि.क्र. ८९/१ वर दाखल असलेल्या मृत्यूदाखल्यावरुन मयत प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले हया दि. २८/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे

निदर्शनास येते. वादीच्या अर्जातील कथन तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र. ५ यांच्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादीस प्रतिवादी क्र. ५ यांचे वारस अभिलेखावर घेणेची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू, वादीने प्रतिवादी क्र. ५ यांच्या वारसांना मुदतीत अभिलेखावर समावेश न केल्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण निष्कारण प्रलंबित राहिले व प्रतिवादींना विनाकारण मानसिक त्रास सहन करावा लागला. त्यामुळे सदरच्या बाबीसाठी वादी यांच्यावर खर्चाचे आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो,

**<u>आदेश</u>**

१. अर्ज वादीने रक्कम रुपये १०००/– (रुपये एक हजार फक्त) प्रतिवादींना खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने उपरोक्त नमूद अटीची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. ५ सखुबाई श्रीपती फुले यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.03.11 17:12:45 +0530

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – ११/०३/२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ११/०३/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ११/०३/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १२/०३/२०२६ |